साकेतांक क्र 1990032322

५८

२०५

क्रमांक कॉन/एल.आर. ९५०/२३/क-१/९०
पुणे, दिनांक :- २३/३/१९९०

विषय :- जमीन एकत्रीकरण योजना
पोट हिस्सा मोजणी बाबत

प रि प त्र क :

मुंबईचा जमीनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करणे व त्यांचे एकत्रीकरण करणे बाबत अधिनियम १९४७ मधील कलम ८ अन्वये स्थानिक क्षेत्रांतील जमीनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध केलेला असून, कलम ८ अ अ मध्यें नवीन तुकडा निर्माण होणार नाही अशा त-हेनें वाटप करणेची तरतूद केलेली आहे.

२/- वरील तरतूदी विचारांत घेऊन एकत्रीकरण योजनेचे वेळी कोणते तुकडे/हिस्से मोजावेत याबाबत इकडील परिपत्रक क्रमांक सम दिनांक ९/१/५२ ने स्पष्ट सूचना दिलेल्या आहेत. त्या विचारांत न घेतां जागेवर आढळणारे प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्राचे हिस्से कायदेशीर तरतूदीचा भंग करुन मोजले गेले आहेत असे माझे निदर्शनास आले आहे. सबब मोजणी बाबत खालील प्रमाणे सूचना देण्यत येत आहेत.

[१] कोणत्याही परिस्थितीत प्रमाणभूत क्षेत्रापेक्षां कमी क्षेत्राचे हिस्से मोजण्यांत येऊ नयेत.

[२] कांही अपरिहार्य कारणास्तव प्रमाणभूत क्षेत्रापेक्षां कमी क्षेत्राचे हिस्से मोजणे आवश्यक वाटल्यास त्याबाबत जरुर त्या कागदपत्रासह उपसंचालक भूमि अभिलेख, यांचे मार्फत प्रस्ताव सादर करुन त्यास जमाबंदी आयुक्त पुणे यांची मान्यता प्राप्त करुन घेऊन, तदनंतरच अशा हिश्यांची मोजणी करणेत यावी.

सही/- [नवीन कुमार]
जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमि अभिलेख, [महाराष्ट्र राज्य]पुणे

प्रत /- भूमि अभिलेख खात्यांतील सर्व अधिका-यांना माहिती व कार्यवाहीसाठी अग्रेषित.
प्रत /- सहाय्यक जमाबंदी आयुक्त, [सर्वसाधारण], [भूमापन]
व सर्व कार्यासन अधिकारी, जमाबंदी आयुक्त कार्यालय
प्रत /- रचना व कार्यपध्दती अधिकारी जमाबंदी आयुक्त पुणे यांचे कार्यालय
प्रत /- अभिलेखापाल जमाबंदी आयुक्त कार्यालय यांना अग्रेषित,

" नि र्ग मि त "

सहाय्यक जमाबंदी आयुक्त, २३/३
[एकत्रीकरण]पुणे

नालबंद/९०

S-35

83

क्रमांक कॉन/एल.आर. ९५०/२३/क-१/९०
पुणे, दिनांक :- २३/३/१९९०

विषय :- जमीन एकत्रीकरण योजना
पोट हिस्सा मोजणी बाबत

प रि प त्र क :

मुंबईच्या जमीनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करणे व त्याचे एकत्रीकरण करणे बाबत अधिनियम १९४७ मधील कलम ८ अन्वये स्थानिक क्षेत्रांतील जमीनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध केलेला असून, कलम ८ अ अ मध्ये नवीन तुकडा निर्माण होणार नाही अशा त-हेने वाटप करणेची तरतूद केलेली आहे.

२/- वरील तरतूदी विचारांत घेऊन एकत्रीकरण योजनेचे वेळी कोणते तुकडे/हिस्से मोजावेत याबाबत इकडील परिपत्रक क्रमांक सम दिनांक ९/१/५२ ने स्पष्ट सूचना दिलेल्या आहेत. त्या विचारांत न घेता जागेवर आढळणारे प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्राचे हिस्से कायदेशीर तरतूदींचा भंग करुन मोजले गेले आहेत असे माझे निदर्शनास आले आहे. सबब मोजणी बाबत खालील प्रमाणे सूचना देणेत येत आहेत.

[१] कोणत्याही परिस्थितीत प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्राचे हिस्से मोजण्यांत येऊ नयेत.

[२] कांही अपरिहार्य कारणास्तव प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्राचे हिस्से मोजणे अवश्यक वाटल्यास त्याबाबत जरुर त्या कागदपत्रासह उपसंचालक भूमि अभिलेख, यांचे मार्फत प्रस्ताव सादर करुन त्यास जमाबंदी आयुक्त पुणे यांची मान्यता प्राप्त करुन घेऊन, तदनंतरच अशा हिश्यांची मोजणी करणेत यावी.

सही/- [नवीन कुमार]
जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमि अभिलेख, [महाराष्ट्र राज्य] पुणे

प्रत /- भूमि अभिलेख खात्यांतील सर्व अधिका-यांना माहिती व कार्यवाहीसाठी अग्रेषित.
प्रत /- सहाय्यक जमाबंदी आयुक्त, [सर्वसाधारण], [भूमापन]
व सर्व कार्यासन अधिकारी, जमाबंदी आयुक्त कार्यालय
प्रत /- रचना व कार्यपध्दती अधिकारी जमाबंदी आयुक्त पुणे यांचे कार्यालय
प्रत /- अभिलेखापाल जमाबंदी आयुक्त कार्यालय यांना अग्रेषित,

" नि र्ग मि त "

सहाय्यक जमाबंदी आयुक्त, 23/3
[एकत्रीकरण] पुणे

नालबंद/९०

G-36